# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण कंपनीचे

# ध्येयस्वप्न, कार्य आणि उद्दिष्टे

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# आमचे ध्येयस्वप्न व कार्य

विजेचे पारेषण करण्याच्या कार्याचे नियोजन, त्यासंबंधीच्या प्रकल्पांची अंमलबजावणी, संचालन क्षमता आणि खर्च व गुणवत्ता या बाबत सदैव जागरूकतेवर भर देऊन कार्यपालन करणारी, तसेच मानवी संसाधनांचा विकास करणारी आणि कंपनीची सामाजिक जबाबदारी मानणारी एक आदर्श राज्य पारेषणाची उपयोगी संस्था आणि एक आदर्श परवानाधारक पारेषण कंपनी म्हणून स्वत:ची प्रतिष्ठापना करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# उद्दिष्टे

१. एक विश्वासु व रास्त खर्चाची आंतर राज्य पारेषण प्रणाली निर्माण करण्यासाठी वीज जाळयाची उभारणी करून त्यासाठी गुंतवणूकीचे नियोजन करणे तसेच अशा प्रणालींचा अभ्यास व रचना क्षमता यामध्ये गुणवत्तेनुसार सर्वोत्कृष्ठ ठरणारी संघटना निर्माण करणे व त्यात प्रणाली नियोजनाचे सामर्थ्य वाढविणे.

२. वीज पारेषणाचे जाळे नेहमी सुरक्षित, स्थिर व समतोल राखण्याची खात्री देणे.

३. अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त असे राज्य भार प्रेषण केंद्र विकसित करणे, त्यासाठी संलग्न संपर्क साधने आणि स्काडा आर.टी.यू. (पर्यवेक्षकीय नियंत्रण व माहिती संलग्न – दूरस्थ अग्र केंद्र) या प्रणालींचा तसेच ज्ञान व्यवस्थापन शास्त्र आणि प्रत्यक्ष कार्य कौशल्य आदिचा सुयोग्य वापर करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# उद्दिष्टे

४. ऊर्जा हानि कमी करणे.

५. कामाचे नियोजन, वीज जाळ्यांचा विकास, त्याचे संचालन व सेवा देणे. ही कामे करतांना सर्व वैधानिक व नियामक संहिता, निर्देश व लक्ष्ये पूर्ण करणे.

६. संचालन, देखभाल व उभारणी आदि सर्व जबाबदाऱ्या पार पाडतांना सुरक्षिततेची खात्री करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# उद्दिष्टे

७. वीज भाराचे रूपांतरण करण्याच्या क्षमतेची लक्ष्ये गाठणे.

८. पारेषणाच्या वीज वाहिन्या कार्यान्वित करण्याची लक्ष्ये गाठणे.

९. पारेषणाची वीज उपकेंद्रे यांचे संबंधीची सर्व कामे म्हणजे वीज उपकेंद्रांचे संकल्प चित्र तयार करणे, (Design) त्यानुसार त्यांचे बांधकाम व स्थापना करून ती कार्यान्वित करणे. त्याचे संचालन करून ती सुव्यवस्थित राखणे. त्यांचे संरक्षण करणे, वीज उपकेंद्रातील संपर्क व्यवस्था चालू ठेवणे, तेथील माहिती प्रणालीचे जतन करणे, बिघाडांबाबत निदान करणे व त्यांची दुरूस्ती, पुनर्रचना करणे, व या उपकेंद्रांचे आयुष्य वाढविण्याचे उपाय योजणे. या सर्व कामांवर लक्ष ठेवणे व त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे.

१०. निगराणी, विश्वास, पारदर्शकता व खुला संवाद अशी वैशिष्टापूर्ण व्यवस्थापन संस्कृती विकसीत करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# उद्दिष्टे

११. कंपनीच्या संपूर्ण रचनेत सुदृढ नैतिक कार्यसंस्कृती, गुणवत्तेविषयीची जागरूकता व उच्च दर्जाची कामगिरी करून दाखविण्याची वृत्ती या गुणांची स्थापना करणे.

१२. कंपनीत विविध स्तरांवर कामे करणारा कर्मचारी वृंद आणि संवर्ग यांच्यात व्यावसायिक व संघटने विषयी अभिमानाची भावना व एकमेका विषयी दाट नात्याचा भावबंध निर्माण करणे.

१३. कंपनीचे ग्राहक, प्रकल्पग्रस्त व्यक्ती, समाजातील वंचीत घटक आणि पर्यावरण यासाठी सामाजिक जबाबदारीने काम करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# <u>वित्त व लेखा विभाग</u>

# <u>उद्दिष्टे आणि ध्येये</u>

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# वित्त व लेखा विभागाची उद्दिष्टे

१. कंपनीच्या भांडवली खर्चाच्या कार्यक्रमातील प्रकल्पांचे संचालन व अंमलबजावणी यासाठी पुरेशा निधीची व सर्व कामांचा खर्च किमान राहील याची खातरजमा करणे.

२. वित्त व लेखा संबंधीच्या सांविधिक आवश्यकता व त्यासोबत कंपनीच्या संचालक मंडळाने विहीत केलेली प्रमाणके व कार्यपध्दती यांची पूर्तता करणे.

३. जनतेकडून निधी उभारण्यासाठी कंपनीचा आय.पी.ओ. करण्यासाठी महापारेषण कंपनीला सज्ज करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# वित्त व लेखा विभाग: नित्यकार्यांचे ध्येये

उद्दिष्टे–एक:

१. वार्षिक अर्थसंकल्पाशी सुसंगत असा पुरेसा व वेळेवर महसूल व रोख ‘भांडवल’ उपलब्ध राहील याची खात्री देणे.

२. भांडवली खर्चाच्या कार्यक्रमासाठी वित्तीय संस्थांकडून वेळेवर कर्जे संवितरीत होतील याची खात्री देणे.

३. पुरवठादार/ठेकेदार यांची देयके व कर्मचाऱ्यांची देणी यांबाबत घोषित प्रमाणकानुसार वेळेवर प्रक्रिया करून ती रक्कम चुकती करणे.

४. वित्तीय भार असलेल्या सर्व प्रस्तावांची कालबध्द–रित्या छाननी करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# वित्त व लेखा विभाग: नित्य ध्येये

उद्दिष्टे–दोन:

४. लेखांचे अंतिमीकरण (त्रैमासिक निष्कर्षांचे प्रकाशन समाविष्ट), सांविधिक लेखा परिक्षणांची पूर्तता, खर्चाचे लेखा परिक्षण आणि सांविधिक विवरण पत्रे दाखल करणे ही कामे वेळापत्रकानुसार करणे.

५. शासकीय लेखा परिक्षण/सार्वजनिक उपक्रम समिती यांच्या अभिप्रायातील संबंधित तपासणीमधील अभिप्रायाबाबत वेळेवर कार्यवाही करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# वित्त व लेखा विभाग: विशेष ध्येये

## उद्दिष्टे–एक:

१. अंतर्गत लेखा परिक्षण बळकट करणे व संचालनाचा खर्च व मत्तांचे व्यवस्थापन यांचे खर्च किमान ठेवणे.

२. निधी उभारण्यासाठी एक आराखडा तयार करणे व पाच वर्षांच्या भांडवली खर्चाकरीता स्पर्धात्मक दराने निधी उभारण्याची प्रक्रिया सुरू करणे. यामध्ये बहूवर्षीय दर कोष्टक व एकूण महसूलाची गरज यांच्या विनंती अर्जात प्रक्षेपित केलेल्या महसुलाद्वारे कर्ज परतावा करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# वित्त व लेखा विभाग: विशेष ध्येये

३. कर्जाच्या परतफेडीसाठी व्यवसाय प्रक्रिया अभियांत्रिकी (Business Process Engineering) ही कार्यपध्दती सुरू करणे, खर्चावर लक्ष ठेवणे, लेखा व वित्तीय विवरणपत्रे तयार करणे तसेच खर्च कमी करण्यासाठी इ.आर.पी – Enterprise Resource Planning उद्योग संसाधन नियोजन हा कार्यपध्दती अंमलात आणणे.

४. मत्तांचे भांडवलीकरण करण्याबाबत लक्ष देणे, ती प्रक्रिया अधिक बळकट करणे आणि मत्तांचे अंशत: भांडवलीकरणास साहाय्य करणे.

५. कंपनी अधिनियम १९५६, यानुसार नवीन लेखा धोरणे अंमलात आणणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# वित्त व लेखा विभाग: विशेष ध्येये

६. बाजारातून सार्वजनिक रित्या भांडवल उभारणी करण्यासाठी विविध पर्यायांची आखणी करणे आणि त्याची पूर्व तयारी करणे.

७. पत विषयक दर्जा देणाऱ्या संस्थाकडून (Credit Agencies) पत दर्जा मिळविणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# मानव संसाधन विभाग

# उद्दिष्टे व ध्येये

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# मानव संसाधन विभाग - उद्दिष्टे

१. कर्मचाऱ्यांची काळजी घेणारी, त्यांच्यात विश्वास निर्माण करणारी व पारदर्शकता असणारी व्यवस्थापन संस्कृती विकसीत करणे.

२. मूल्ये व कार्यविषयक नीति यांची जपणूक करणे.

३. गुणवत्ता व उच्च दर्जाची कामगिरी करण्याची वृत्ती अंगीबाणविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बदलांना स्विकारण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनाला नवी दिशा देणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## मानव संसाधन विभाग - उद्दिष्टे

४. मानव संसाधनांची उत्पादकता वाढविण्यासाठी मनुष्यबळ विकास, उत्तराधिकाराचे नियोजन, निवडपध्दती, पदांवर नियुक्ती आणि प्रशिक्षण यांची कार्यक्षम व प्रभावी कार्यपध्दती विकसीत करणे.

५. एका परिणामकारक कार्यपालन व्यवस्थापन प्रणाली स्थापन करण्यासाठी सुविधा निर्माण करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# मानव संसाधन विभाग : ध्येये

उद्दिष्टे–एक:

१. भरती, पदोन्नती, बदली व नियुक्ती यासाठी तर्कसंगत व पारदर्शक प्रक्रिया स्थापन करणे आणि त्याकरिता सुस्पष्ट धोरणे नमूद करणे, माहिती प्रकाशित करणे, तसेच कंपनीची ध्येये, लक्ष्ये व कामगिरीच्या आढाव्याचे मापदंड याची माहिती सर्वांना देणे, आणि कर्मचाऱ्यांना समोपदेशन व मार्गदर्शन करणे.

उद्दिष्टे–दोन:

२. मूल्ये व कार्यनीतीची तत्वे यांची माहिती सर्वांना देणे व त्याचे महत्व बिंबविणे.

३. प्रत्यक्ष वर्तणूक व कर्तृत्व दर्शविणाऱ्या कर्मचाऱ्यांची प्रशंसा करणे.

४. कामचुकार कर्मचाऱ्यांवर वेळीच व निर्णायक कारवाई करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# मानव संसाधन विभाग : ध्येये

• उद्दिष्टे–तीन:

५. कर्मचाऱ्यांच्या वृत्ती / कार्यवृत्तीत बदल घडविण्यासाठी विविध प्रकारे त्यांच्याशी संवाद साधणे आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# मानव संसाधन विभाग : ध्येये

•उद्दिष्टे—चार:

६. मनुष्यबळाच्या आवश्यकतेचे मुल्यांकन करणे, त्यासाठी पुढील बाबी विचारात घेणे, मनुष्यबळाची प्रमाणके, प्रवर्तन कार्याचा होणारा विस्तार, भांडवली खर्चातील वाढ, तंत्रज्ञानातील सुधारणा, आणि कमाल उत्पादकतेच्या हमीसाठी व्यावसायिक प्रक्रिया केले जाणारे बदल.

७. कंपनीतील वेतन रचनेसाठी निश्चित केलेल्या अन्य मापकांच्या संदर्भात तौलनिक अभ्यास करणे, त्यानुसार नवीन वेतन रचना तयार करणे तसेच पदोन्नतीकरिता कालबध्द प्रमाणके ठरविणे.

८. निर्णय घेण्याची प्रक्रिया अधिक जलद होण्यास साहा्यक अशा मानव संसाधनाच्या विद्यमान प्रक्रियेची पूनर्रचना करणे.

९. भरती व पदोन्नती}ारे रिक्तपदे वेळेवर भरण्याची खातरजमा करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# मानव संसाधन विभाग : ध्येये

•उद्दिष्टे–पाच:

१०. 'कार्यपालन व्यवस्थापन प्रणाली' परिणामकारक रित्या अंमलात येत असल्याबद्दल खात्री करणे व कामगिरीस अनुरूप बक्षीस देणे.

११. सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्यांविषयीची बांधिलकी व स्वास्थ्य अधिक वाढावे यासाठी व्यक्तिगत आणि व्यावसायिक विकासाची उपाययोजना तसेच प्रेरक धोरणे तयार करणे व ती अंमलात आणणे.

१२. कर्मचाऱ्यांचे एकमेकांशी संबंध सुधारावेत आणि त्यांच्यात सद्‌भावना वाढावी यासाठी उपाय योजना करणे, याशिवाय कर्मचारी कल्याणविषयक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# सांघिक संवाद

# उद्दिष्टे व ध्येये

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# <u>उद्दिष्टे</u>

कंपनीचे ध्येय, स्वप्न, कार्य, त्यातील उद्दिष्टे, लक्ष्ये, कामगिरी व सामाजिक जबाबदारी यांची माहिती कंपनीच्या सर्व हितसंबंधी घटकांना सातत्याने पुरविणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# ध्येये–माध्यमांशी नाते–संबंध

कंपनीचे महत्वाचे संदेश संबंधित नेमक्या लोकसमूहापर्यंत (Target Audience) योग्य त्या माध्यमातून वेळोवेळी प्रभावीरित्या पोहोचविण्यासाठी विविध प्रकारच्या प्रसार माध्यमासोबत स्नेहपूर्ण संबंध निर्माण करणे व ते संबंध टिकवून ठेवणे. तसेच कोणत्याही प्रश्नासंबंधी कंपनीचा दृष्टिकोन प्रसार माध्यमातून योग्य प्रकारे प्रसारीत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# ध्येये–कर्मचारी वृदांशी संवाद

अंतर्गत संवाद व संपर्क यासाठी परिश्रम घेणे: कंपनीचे ध्येय, स्वप्न, दृष्टिकोन, उद्दिष्ट व धोरणे ही सर्वदूर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना कळावी व त्यांनी ती त्यांच्या कार्यात, प्रतिबिंबित व्हावीत व त्यानुसार त्यांनी आचरण करावे यासाठी अंतर्गत संवादाच्या योग्य अशा माध्यमांची/मंचाची/व्यासपिठाची रचना करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# ध्येये—कंपनीची सामाजिक जबाबदारी

‘कंपनी म्हणजे सांघिक स्वरूपात अस्तित्व असलेली एक जबाबदार नागरीक आहे’ अशी कंपनीची प्रतिमा समाजात निर्माण करण्यासाठी प्रभावी संवाद विकसित करणे. समाजात विकास व सदिच्छा निर्माण करण्यास साहा्यक ठरणारे कार्यक्रम तयार करून ते अंमलात आणणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# समस्येच्या काळात संवाद व्यवस्थापन

कंपनीपुढे कोणतीही समस्या उद्‌भवल्यास, त्याविषयी माध्यमातून खरीखूरी माहिती प्रसारीत करण्याच्या दृष्टिने तात्काळ कार्यवाही करणे. अशाप्रसंगी वरिष्ठ स्तरावरील व्यवस्थापनाशी सातत्याने समन्वय ठेवून ग्राहक व जनता यांच्यात विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी, तसेच कर्मचाऱ्यांचे नीतीधैर्य उंचावलेले राहण्यासाठी आणि गुंतवणूकदारांशी बांधलिकी कायम राहील या उद्देशाने कार्य करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# ध्येये—संबंधित प्रकाशन साहित्य आदिंचा विकास

कंपनीची अन्य संबंधित प्रकाशने म्हणजेच वार्षिक अहवाल, माहिती पत्रिका, कंपनीचे माहितीपट (फिल्मस), सादरीकरणे, प्रसारमाध्यमा}ारे प्रसिध्दी इत्यादीची निर्मिती व प्रसारण करणे, व ती योग्य ठिकाणी पोहोचविणे.

# पारेषणचे प्रकल्प
# उद्दिष्ट व ध्येये

# पारेषण प्रकल्प – उद्दिष्टे

**वीज भार रूपांतरणाचे प्रकल्प**

वीज भाराचे रूपांतरण करण्याची क्षमता वाढविण्यासाठी पंचवार्षिक योजनेतील लक्ष्ये पूर्ण करण्याकरिता तसेच वेळापत्रक व अर्थसंकल्पातील तरतूद यांच्या विनिदेशित मर्यादेत पारेषणाच्या वीज वाहिन्या कार्यान्वित करणे, यासाठी खालील उद्दिष्टे आहेत.

१. निर्मिती प्रकल्पात निर्माण केलेल्या विजेचे निस्कासन (Evacuation) करणे.

२. ग्राहकांना योग्य वीजभाराने (Voltage) वीज पुरविणे.

३. वीज भारात (मागणीत) होणारी वाढ पूर्ण करणे.

४. विजेच्या विश्वासार्ह पुरवठ्यासाठी यंत्रणेत अनावश्यक अधिक्य (Redundancy) ठेवणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# ध्येये – पारेषण प्रकल्प

१. वाढत्या मागणीनुसार वीज पारेषण जाळ्यांचा विस्तार करण्याच्या योजना आखणे व त्यांच्या उभारणी व बांधकाम रचना करतांना बचत, अत्याधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षा व गुणवत्ता नियंत्रण या बाबींवर भर देणे.

२. प्रकल्पांच्या कार्यात तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्य क्षमता विकसीत करणे

३. बांधकामाची व उभारणीची लक्ष्ये पूर्ण करतांना आवश्यक ते सर्व साहित्य आणि संसाधने उपलब्ध असल्याची खात्री करणे. यामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ व प्रभावी संघटनात्मक रचना यांचाही समावेश आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# ध्येये – पारेषण प्रकल्प

४. प्रकल्पांचे सर्वेक्षण व प्रारूप अहवाल तयार करणे, मान्यता मिळविणे, साहित्य व कंत्राटे व्यवस्थापनासाठी प्रभावी व्यूहरचना व व्यावसायिक प्रक्रिया अंमलात आणणे.

५. पुरवठादार/सेवा देणारे उद्योजक यांची नोंदणी करणे, कंत्राट देणे, साहित्य मिळवून त्याची साठवण करणे, बांधकामात सुरक्षेची खबरदारी घेणे व गुणवत्तेचे नियोजन करणे ही सर्व कामे विर्निदेशीत पध्दतीने केली जातील याविषयी खातर जमा करणे.

६. दीर्घ मुदतीच्या कामांच्या प्रगतीसाठी संबंधित शासकीय प्राधिकारी, महत्वाचे कंत्राटदार, पुरवठादार तसेच ग्राहक यांच्याशी सातत्याने संपर्क व समन्वय ठेवणे.

७. बाह्य संस्थां संबंधीत परिपूर्ण सर्वेक्षण, भूसंपादन, बोली प्रक्रिया व्यस्थापनाकरिता तज्ञांचा सल्ला व कामाच्या स्थळी पोहोचण्यासाठी रस्ता मिळविण्याचा हक्क (Right of way)

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# पारेषण, संचालन व सुव्यवस्था उद्दिष्टे व ध्येये

# उद्दिष्टे – संचालन व सुव्यवस्था

१. वीज पारेषण प्रणालीची उपलब्धता नेहमी ९९ टक्के पेक्षा जास्त ठेवणे.

२. आंतरराज्य पारेषण प्रणाली विश्वासार्ह व स्थिर ठेवणे.

३. ऊर्जा हानि ४ टक्के इतकी कमी करण्यासाठी ठरवून दिलेली सर्व प्रमाणके व लक्ष्ये यांची पूर्तता करणे.

# उद्दिष्टे – संचालन व सुव्यवस्था

४. आपली महापारेषण कंपनी देशातील अन्य परवानाधारक पारेषण कंपन्यांच्या तुलनेत सर्वश्रेष्ठ असली पाहिजे, या ध्येयाने संचालन विषयक सर्व मापदंड, देखभालीची कार्यपध्दती, संरक्षण प्रणाली, संपर्क व माहिती प्रणाली आणि यांत्रिक बिघाडांचे निदान दुरूस्ती करणे आणि प्रणालीचे आयुष्य वाढविणे.

५. संचालन व सुव्यवस्थांच्या विविध कार्यात सुरक्षितते विषयी खात्री बाळगणे.

६. देखभाल, दुरूस्ती व त्यानंतर यंत्रणा पुर्वरत चालू करणे व तिचे आयुष्य वाढविणे याकरिता दिलेली प्रमाणके व लक्ष्ये पूर्ण करणे.

# ध्येये– संचालन व सुव्यवस्था

१. विहीत मापदंडानुसार पारेषण प्रणालीचे संचालन करणे.

२. देखभालीच्या वेळापत्रकानुसार ठरलेल्या कालावधीनंतर देखभालीची कामे काटेकोरपणे पूर्ण करणे.

३. वीज खंडित होण्याचे प्रकार व त्याचा कालखंड कमी करणे.

४. विविध यंत्रे इत्यादी बंद पडण्याचे प्रमाण कमी करणे.

५. यंत्राचे सुटे भाग पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतील याची खबरदारी घेणे.

६. एल. इ. योजना वेळेवर पूर्ण करण्याची खात्री करणे.

७. पर्याप्तीकरण (Optimization) आणि प्रतिक्रिया शक्तीचे पूर्नभरण (Reactive Power Compensation) यांच्यामार्फत पारेषण हानि कमी करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# ध्येये—संचालन व सुव्यवस्था

८. कंपनीचे प्रत्येक वीज उपकेंद्र हे आदर्श उपकेंद्र असले पाहिजे यासाठी संचालन, सुव्यवस्था, संरक्षण व संपर्क यांच्या अत्याधुनिक व विश्वासार्ह पध्दतीच्या उपयोग करणे.

९. संचालन व सुव्यवस्था कामाच्या दरम्यान आग व अपघात होणार नाहीत यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करून सुरक्षा बाळगणे.

१०. महत्वाच्या कर्मचाऱ्यांच्या कौशल्याचा विकास करणे व त्यांचे ज्ञान अद्यावत करणे यासाठी योजना आखून त्या अंमलात आणणे

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# विशेष ध्येये

१. ए.बी.टी. मिटरींगची अंमलबजावणी करणे.

२. समतोलकारक व्यवस्था यंत्रणा (BSM) स्थापन करणे.

३. इ.आर.पी.–एम.आय.एस. स्थापन करणे

४. स्काडा स्थापन करणे.

५. निवडक उपकेंद्रात SMS/एस.एम.एस. स्थापन करणे.

६. जे.बी.आय.सी. प्रकल्पांचा प्रारंभ करणे.

७. नवीन तंत्रज्ञान वापरण्यासाठी व नव्या संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी एक विशेष कक्ष सुरू करणे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

# धन्यवाद



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.